IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
*Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal*
ISSN 2455-4375

# कोविड–१९ चा भारतातील महिलांवर झालेला परिणाम.

**डॉ. दिलीप सिताराम मस्के**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
आंबेजोगाई.

---

## प्रस्तावना

कोरोनाव्हायरस रोग २०१९ ( कोविड–१९) हा एक अति संसर्गजन्य रोग असून या रोगाने संपूर्ण विश्वामध्ये थैमान घातले आहे. डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या हुबेई प्रांताची राजधानी वुहान मध्ये या नवीन आजाराची पहिली ओळख करण्यात आली होती .आणि नंतर जागतिक स्तरावर या आजाराचा प्रसार झाला जागतिक आरोग्य संघटनेने हा कोरोनाव्हायरस रोग २०१९ ( कोविड–१९) चा उद्रेक हा सार्वजनिक आरोग्यासाठी आंतरराष्ट्रीय आणीबाणी असल्याचे सांगून या उद्रेकाला जागतिक महामारी जाहीर केले. टेड्रॉस एडमहॅनोम गॅब्रेयेसोस यांनी कोविड–१९ नाव घोषित केले.

भारतात २७–१–२०२० रोजी केरळ राज्यात पहिला रुग्ण आढळला आणि २३ मार्च २०२० रोजी संपूर्ण भारत देशात लॉक डाऊन करण्यात आली. कोविड १९ चा परिणाम केवळ व्यक्तीवरच नाही तर ज्या क्षेत्रात तो काम करतो त्या सर्व सामाजिक, राजकीय, आर्थिक ,धार्मिक ,शैक्षणिक ,संस्कृतिक इत्यादी क्षेत्रावर झालेला आहे.

## उद्दिष्टे

१. कोविंड –१९ च्या जागतिक आपत्तीचा अभ्यास करणे.
२. कोविंड –१९ चा भारतीय समाजावर झालेल्या परिणामाचा शोध घेणे.
३. कोविंड –१९ चा भारतीय महिलावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

## गृहीत कृत्ये

१. कोविंड –१९ ही जागतिक स्वरूपाची आपत्ती आहे.
२ कोविंड १९ चा भारतीय समाजाच्या विविध क्षेत्रावर परिणाम झालेला आहे.
३. कोविंड –१९ मुळे भारतात अनेक गंभीर समस्या निर्माण झालेले आहेत.

## संशोधन पद्धती

सदरील संशोधन पेपर लिहिण्यासाठी दुय्यम तथेयांचा आधार घेण्यात आला आहे. ज्यात वर्तमानपत्रे, मासिके, संकेतस्थळे ,व्हिडिओ, ऑडिओ, व्हाट्सअप ,फेसबुक इत्यादींच्या माध्यमातून जी माहिती आली तिला आधार मानून पेपर तयार करण्यात आलेला आहे.

जगात मोठ्य संख्येने कोविड–१९ चा लोकांना संसर्ग होऊन अधिक प्रमाणात मृत्यू होत आहेत. सरकारने या गंभीर समस्यांमुळे संपूर्ण जगभरात लॉकडाऊन लावली. याचा लोकांवर नकारात्मक परिणाम झालेला दिसतो विशेषतारू महिलावर मोठा परिणाम झालेला आहे. त्याचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे

**आर्थिक परिणाम**

कोविड–१९ चा संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर विशेषतारू भारताच्या विकसनशील देश म्हणून मोठा परिणाम झाला. पुरुषांच्या तुलनेत महिलांचे आर्थिक जीवन अधिक प्रभावित झाले आहे. ज्या स्त्रिया घराच्या प्रमुख असतात त्यांना जास्त त्रास सहन करावा लागत आहे.

**शैक्षणिक**

कोविंड –१९ या आजारामुळे सर्व शैक्षणिक क्षेत्रे बंद पडले. अनेक लहान मुलावर होणारे संस्कार थांबले

**सांस्कृतिक**

कोविंड –१९ मुळे भारतातील अनेक जाती धर्मातील सण ,उत्सव साजरी करणे परंपरेला अनुसरून जीवन जगणे, यात्रा ,मनोरंजन विचारांची देवाण–घेवाण इत्यादी गोष्टी थांबल्या

**आरोग्यावर परिणाम**

महामारी आणि भारतातील कडक लॉकडाऊनमुळे आरोग्य सेवा विशेषतारू माता–बालक संगोपन, कुटुंब नियोजन आणि गर्भपात सेवांचा महिलावर विपरीत परिणाम झाला आहे .वैद्यकीय सुविधा मध्ये सूट **देण्यात आली असली तरी संसर्ग वाढण्याच्या भीतीमुळे अनेक महिला आजाराला बळी पडल्या.**

**कौटुंबिक हिंसा**

लॉकडाऊन च्या काळात राष्ट्रीय महिला आयोगाच्या मते लिंगाधारित हिंसाचाराच्या तक्रारी मोठ्य प्रमाणात वाढल्या घरगुती हिंसाचाराच्या घटनेमध्ये दुप्पट वाढ झाली.

**काळजीच्या कामात वाढ**

कोविड–१९ च्या काळात लोकडाऊन मुळे जागतिक अर्थव्यवस्था बंद पडली .शाळा बंद पडल्या आणि अर्धी लोकसंख्या त्यांच्या घरातच मर्यादित राहिली ही स्थिती भारतातही होती तरीही लाखो काळजी घेणारी कामगार जसे परिचारिका, सामुदायिक आरोग्य कर्मचारी ,स्वच्छता कामगार ,कपडे धुणे आणि

कामगार इत्यादींचे काम कमी झाल्याने कमी पगार मिळतो का? नोकरी जाते का ?आणि जीवनात असुरक्षितता वाटू लागली.

**नवीन जीवनशैलीचा अंगीकार**

कोरोना महामारी मुळे व्यक्तीला नवीन जीवनशैलीचा अंगीकार करावा लागला कुटुंबामध्ये पूर्वी काम करण्यासाठी अनेक स्त्रियांना बोलावले जात असे त्यांच्याकडून कपडे धुणे, भांडी घासून घेणे, घराची स्वच्छता करणे ,स्वयंपाक करणे इत्यादी कामे केली जात असत परंतु आज ती कामे घरातलीच सदस्य करताना दिसत आहेत .तसेच बाहेर हॉटेलमध्ये जाऊन जेवणे, विविध सहलीच्या ठिकाणी जाणे ,मनोरंजन करणे ,खरेदी करणे, मौजमजा करणे इत्यादी गोष्टी बंद झाल्या स्त्रिया ब्युटी पार्लर ला जाण्यापेक्षा तोंडावर मास्क घालने अधिक पसंत करू लागल्या वारंवार चहा पिणे ,गरम पाणी पिणे ,उष्ण पदार्थ खाणे, वारंवार हात स्वच्छ धुऊन सॅनिटायझर करणे इत्यादी गोष्टी महत्त्वाच्या ठरत आहेत.

**निष्क f**

अशा प्रकारे कोविड–१९ महामारी मुळे भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये सामाजिक आणि आर्थिक जागतिक संकट निर्माण झाले आहे. या संकटात पुरुषांपेक्षा महिलांना जास्त त्रास होतो त्यांना योग्यप्रकारे संबोधने आवश्यक आहे.

**संदर्भ**


- कोरोना काळातील टीव्हीवरील बातम्या चे निरीक्षण.
- कोरणा काळातील शासन परिपत्रके व शासकिय अहवाल.
- कोरोना परिस्थितीची प्रत्यक्ष अवलोकन.
- www.covid.com